## प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २३.०३.२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | पुंडलीक हुनसिंग जाधव, वय ५३ वर्षे, पद : वरिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती, वर्ग —३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक २३.०३.२०२१ चे २०.०५ वा. |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ५,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | शिक्षणाधिकारी कार्यालय, जि.प.अमरावती, भातकुली पंचायत समिती आवार, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक १६.०३.२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे पत्नीचे वरिष्ठ वेतनश्रेणी प्रस्तावात शिक्षणाधिकारी कार्यालय, जि.प.अमरावती कडुन झालेल्या चुकीचे प्रवर्गाची दुरुस्ती आदेशावर वरिष्ठांची सही घेवुन देण्याकरीता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून २५,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे व त्यापैकी २०,०००/— रुपये यापूर्वीच स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरीत ५,०००/— रुपये लाचेची मागणी असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक २३.०३.२०२१ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून आलोसे ५,०००/— लाच स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरुन आरोपींविरुध्द पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.नि.संतोष इंगळे, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.ना.युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,
ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री कमांक : १०६४

दुरध्वनी कमांक : ०७२१—२५५२३५५,२५५३०५५

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned with CamScanner